**CNR No. :- MHSI100003092018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–

## –: निशाणी ९६ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत वादी क्र. ६ चे कायदेशीर वारसांना दाव्यामध्ये सामील करुन तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील वादी क्र. ६ सुभद्रा अर्जुन ठाकुर ही दि.१४.०४.२०२३ रोजी मयत झालेली आहे. तिचे वारस वादी क्र. ७ ते ११ ही यापुर्वीच सदर दाव्यात सामील आहेत. त्यामुळे वादी क्र. ६ चे नाव कमी करणे आवश्यक आहे. सदर दाव्याच्या न्यायपुर्ततेकामी वादी क्र. ६ चे नावासमोर मयत असे नमुद करुन वादी क्र. ६ हिचे नाव कमी करायचे आहे. सबब वादी यांना वादी क्र. ६ चे नाव कमी करुन तशी दुरुस्ती दाव्यामध्ये करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास तीव्र आक्षेप नोंदवुन अर्ज खोटा व खोडसाळ असल्याने नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता मयत वादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. वारस अभिलेखावर आणण्यास विलंब केलेला आहे. परंतु, केवळ

विलंब झाला म्हणुन वारस अभिलेखावर सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. अर्ज नामंजूर केल्यास अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झालेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**-:: आदेश ::-**

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी ९६ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय सदर खर्चाची रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) भरुन; प्रस्तुत अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यावर तशी दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. सदरची खर्चाची रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

४. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

सही/-***

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – २७.०२.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

दोडामार्ग.